# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
( निवडणूक शाखा )

| | |
|---|---|
| वेबसाईट : www.nwcmc.gov.in | जा.क्र. नांवाशमनपा/निवड/ 28 /2017 |
| ई-मेल : info@nwcmc.gov.in, election@nwcmc.gov.in | दिनांक : 26/07/2017 |
| दुरध्वनी क्र. 02462-233625, 234405, 235710 | फॅक्स क्र. 02462-232071 |

प्रति,

**प्रादेशिक उपआयुक्त,**
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती ,
नांदेड

**विषय :नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक -2017**
**जात प्रमाण पत्र पडताळणी बाबत.**

संदर्भ :- 1 कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांचे पत्र क्र सीव्हीसी-10/2015/ प्रक्र-221/मावक दिनांक 02.03.2016
2 राज्य निवडणुक आयोगाकडील पत्र क्र रानिआ/मनपा2016/प्रक-1/का-5 दिनांक 06.04.2016
3 राज्य निवडणुक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.रानिआ/मनपा2017/प्रक्र37/ का-5 दिनांक 07.07.2017

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुक 2017 साठी माहे ऑक्टोंबर 2017 मध्ये निवडणुक प्रक्रिया पुर्ण होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने राज्य निवडणुक आयोगाने संदर्भ क्र 02 च्या पत्रान्वये सामाजिक न्याय विभागाचे दिनांक 02.03.2016 चे पत्र जोडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी अधिनियमामध्ये अलीकडेच दुरुस्ती केलेली असून त्याद्वारे महापालिका निवडणुकीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षीत असलेल्या प्रभागातून निवडणूक लढविणा-या उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत किंवा या बाबतचा कोणताही पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. तसेच निवडून आलेल्या सदस्यांनी सहा महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद असून मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील कार्यवाही करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सोबत सदर पत्राची प्रत देण्यात येत आहे.

**कृपया मागे पहा---**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्य निवडणुक आयोगाने संदर्भ क्र 3 पत्रान्वये प्रारुप प्रभागाची नव्याने रचना व आरक्षण सोडत जाहिर करण्यात आली असून अंतिम प्रभाग रचना दिनांक 14.08.2017 रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द होणार आहे. प्रारुप प्रभाग रचनेचे आरक्षण सोडतीत राखीव प्रभाग निश्चित करण्यात आले असून त्याची प्रत व शासन राजपत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

करिता आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मागासवर्गीय प्रभागांसाठी आरक्षित आसलेल्या उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी प्रस्ताव विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार स्विकारण्याची कार्यवाही करावी. अशी विनंती आहे.

आयुक्त

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रतिलीपी माहितीस्तव :-

1 मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

2 अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

3 मा. जिल्हाधिकारी, नांदेड